सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Exam Co-ordination Section
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/१६३३

दिनांक : १९/११/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य / मा.संचालक /
सर्व संलग्नित महाविद्यालय / परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय: परीक्षेनंतर उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी Cluster Collection Center नेमण्याबाबत.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६—२०२७ हिवाळी सत्राच्या परीक्षा दि. १९/१०/२०२६ पासून पुणे, नगर व नाशिक शहर व ग्रामीण भागात सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे सुरु असून परीक्षा केंद्रामध्ये परीक्षा झाल्यानंतर उत्तपत्रिकांचे मुल्यमापन करण्यासाठी सदर उत्तपत्रिका त्याच दिवशी केंद्रीय मूल्यमापन केंद्रात जमा करणे बंधनकारक आहे. केंद्रीय मूल्यमापन केंद्र व ग्रामीण भागातील महाविद्यालय या दोन्हीतील अंतर अंदाजे शंभर किलोमीटरच्या आसपास आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महाविद्यालयांना त्याच दिवशी केंद्रीय मूल्यमापन केंद्रास उत्तरपत्रिका जमा करणे जिकरीचे होत असल्याने याबाबत CLUSTER सेंटर नेमण्यात यावे, अशी विचारणा परीक्षा केंद्राकडून झाल्याने सबब खालीलप्रमाणे नमूद केलेल्या ग्रामीण भागातील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा केंद्राने त्यांच्या एकत्रित उत्तरपत्रिका नमूद केलेल्या महाविद्यालयात जमा करण्यात यावे.

अ. क्र.	तालुक्याचे नाव	महाविद्यालयाचे नाव सर्व अभ्यासक्रमाचे Cluster Center	.
१.	आंबेगाव	अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर ४१०५०३ फोन नं. ०२१३३—२२३१६०	सर्व अभ्यासक्रम
२.	जुन्नर		
३.	राजगुरुनगर		
१.	बारामती	मु.सा.काकडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ४१२३०६ फोन नं. ०२११२—२८२१२६	
२.	इंदापूर		
३.	पुरंदर		
४.	दौण्ड		
.१.	संगमनेर	सहकार महर्षी भाऊसाहेब संतोजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर,४२२ ६०५ मोबा. नं.९४२०६३८००३	
२.	अकोले		
३.	कोपरगाव		
४.	राहाता		

१.	मालेगाव	एस.एन. जे.बी.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता.चांदवड, जि. नाशिक ४२३१०१	सर्व अभ्यासक्रम
२.	मनमाड		
३.	देवळा		
४.	बागलाण		
५.	कळवण		
१.	जामखेड	दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, ४१४ ४०२ फोन नं. ९४२२७२७७४४	
२.	कर्जत		
१.	तळेगाव	भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बकोरी फाटा, वाघोली ४१२२०७ फोन नं. ९३२५००५८३७	
२.	पिंपळवंडी		
३.	पाबळ		
४.	शिरुर		

उपरोक्त नमूद केलेल्या महाविद्यालयातून (Cluster Center) शाखेनिहाय उत्तरपत्रिका संबंधीत केंद्रीय मूल्यमापन केंद्रावर पोहचवण्याची व्यवस्था विद्यापीठामार्फत केली जाईल. तसेच केंद्रीय मूल्यमापन केंद्रामध्ये शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना जे मानधन देण्यात येते, तेच मानधन एकत्रित CLUSTER केलेल्या उपरोक्त महाविद्यालयातील एक शिक्षक, दोन शिक्षकेतर कर्मचारी व दोन शिपाई यांना देण्यात येईल. तसेच केंद्रीय मूल्यमापन केंद्रामध्ये उत्तरपत्रिका स्विकारण्याची जी प्रक्रिया केली जाते तीच प्रक्रिया Cluster केलेल्या महाविद्यालयांनी राबवावी. सदर Cluster Centers यांनी Jr. Supervisor Report चा Form II देखील उत्तरपत्रिकांसोबत जमा करुन घ्यावा.

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:

१.मा. कुलगुरू, कुलगुरू कार्यालय
२.मा. प्र-कुलगुरू, प्र-कुलगुरू कार्यालय
३.मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग
४.बारकोड विभाग
५.सर्व केंद्रीय मूल्यमापन केंद्र
६.सर्व Cluster Centers